सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ११ दिनांक :- १९/०५/२०११

ठराव क्रमांक :- ४३

विषय क्रमांक :- १(ज)

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सन्मा.सदस्या सौ.सुमन आकाराम कदम यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिक कार्यक्षेत्रातील सांगली शहरातील वॉर्ड क्र. १६ मध्ये नुकतेच पिण्याचे पाईप लाईनचे उद्घाटन झालेले आहे. सदर भागातील नागरिकांचा पिण्याचा पाण्याचा प्रश्न सुटलेला आहे. सदर पाईप लाईन व्यवस्था ही सांगलीवाडी करीता स्वतंत्र अशी झाली असल्याने, नागरिकांचे दृष्टीने सांगलीवाडीचा पाणी पुरवठ्याचा प्रश्न मार्गी लागलेला आहे. सदरची पाईप लाईन ही स्वतंत्र सांालीवाडीसाठी असल्याने, सदर पाईप लाईनला अन्य कोणतीही पोट पाईप लाईन जोडणेत येऊ नये तसेच सदरची पाईप लाईन सांगलीवाडी साठी स्वतंत्र अशी ठेवणेत यावी. याकामी प्रशासनाने सदर प्रस्तावाची दखल घेवून योग्य ती कार्यवाही ठेवावी असे ही सभा आदेशीत करीत आहे.

सूचक :- Kearon

अनुमोदक :-

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर,

कार्यकारी अभियंता (पा.पु.व.)

महापालिका सचिव,
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका.

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ११ दिनांक :- १९/०५/२०११

ठराव क्रमांक :- ४४

विषय क्रमांक :- १(ज)

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सन्मा.सदस्य श्री.विश्वनाथ रमाकांत सावंत यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील सांगली शहरातील वॉर्ड क्र. ६९ मधील १०० फुटी रोड, पाटणकर मळा, सुशिल बंगला ते लक्ष्मी नारायण कॉलनी ते धामणी रोड द + उ रस्त्यास "स्वातंत्र्य सैनिक कै. रंगनाथ दांडेकर मार्ग" असे नामकरण करणे महासभेने निश्चित केले धोरणानुसार नामकरण प्रस्तावाचे कामी नामकरणाचा जाहिर इरादा प्रसिद्ध करुन सुचना व हरकती मागविणेस व त्याकामी येणारे खर्चास ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- Kaurov

अनुमोदक :-

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर,

मालमत्ता व्यवस्थापक

महापालिका सचिव,
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका.